॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

**बातमी क्र. १**

जळगाव दि.२१ (        ) कोणत्याही परिस्थितीत विद्यापीठाला भविष्यात पाणी टंचाईचा सामना करावा लागू नये असा संकल्प करीत राष्ट्रीय सेवायोजनेच्या ११० पेक्षा अधिक स्वयंसेवकांनी मंगळवार पासून जलसंजिवनी श्रमदान शिबिराद्वारे विद्यापीठातील क्रीडा संकुलालगत तलाव खोलीकरणाच्या कामाला उत्साहात प्रारंभ केला.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परिसरातील संभाव्य पाणी टंचाईकमी करण्यासाठी मंगळवार, दि.२१ मे  पासून पाच दिवसीय विद्यापीठस्तरीय जलसंजिवनी श्रमदान शिबिराला प्रारंभ झाला. तीन जिल्हयातील ११० रासेयो स्वयंसेवक यात सहभागी झाले आहेत. यामध्ये ७५ विद्यार्थी व ३५ विद्यार्थिनी आहेत. मंगळवारी सकाळी ६ वाजता ही सर्व तरुणाई खोदकामासाठी आवश्यक ती सर्व साधनसामुग्री घेऊन विद्यापीठ क्रीडा संकुलालगत असलेल्या तलावाजवळ जमली. श्रमदानाच्या तसेच राष्ट्रभक्तीच्या घोषणा देत व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील यांच्या उपस्थितीत औपचारिक उद्घाटन झाले. त्यानंतर पाच गटांमध्ये सर्व स्वयंसेवकांनी सकाळी १० वाजेपर्यंत घाम गाळत मात्र कोणत्याही प्रकारचा उत्साह कमी न होऊ देता या तलाव खोलीकरणाच्या दृष्टीने चर्‍यांमधील माती काढली. काही जणांनी वृक्षांना आळे करण्याचे काम केले. विद्यार्थ्यांसोबतच विद्यार्थिनींचा उत्साह देखील वाखाणण्याजोगा होता. विद्यापीठाच्या बांधकाम विभागातील अभियंत्यांच्या मार्गदर्शनाखाली हे काम केले जात आहे. यावेळी व्य.प.सदस्य प्रा.नितीन बारी, रासेयोचे संचालक प्रा.पंकजकुमार नन्नवरे, विद्यार्थी विकास संचालक प्रा.सत्यजित साळवे, कार्यकारी अभियंता एस.आर.पाटील,  रासेयाचे जिल्हा समन्वयक डॉ.माधव कदम, डॉ.विजय मांटे, प्रा.कंचन महाजन, डॉ.जगदीश पाटील यांच्यासह विद्यापीठातील अधिकारी-कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.

दुपारी या शिबिराचे अनौपचारिक उद्घाटन व्य.प.सदस्य दिलीप पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी मंचावर प्रा.नितीन बारी, प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.जितेंद्र नाईक, अधिसभा सदस्य मनिषा चौधरी, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, प्रभारी वित्त व लेखाधिकारी एस.आर.गोहिल, प्रा.सत्यजित साळवे, प्रा.पंकजकुमार नन्नवरे उपस्थित होते. यावेळी बोलताना दिलीप पाटील म्हणाले की, या श्रमदानात काम केल्याचा अनुभव आपल्या आयुष्यात येणार आहे. तरुणाईने विचार केला तर पाण्याची कमतरता येणार नाही. तेव्हा पाणी बचतीचा निर्धार आपण करुयात असे आवाहन यावेळी करत या शिबिरातून संस्कार मिळतात. हे संस्कार आजन्म टिकतात तसेच एकमेकांचा स्वभाव कळण्याचे साधन म्हणजे शिबिर होय असे ते म्हणाले. प्रा.नितीन बारी म्हणाले की, एन.एस.एसचा विद्यार्थी हा शिक्षणाच्या पलिकडे जावून काम करतो. या शिबिरातून वेगळे कार्य केल्याचे समाधान मिळते. अधिसभा सदस्य मनिषा चौधरी यावेळी म्हणाल्या की, झाडे तोड, वाहने यामुळे पर्यावरणा ऱ्हास होत आहे. नैसर्गिक वातावरण कमी होत आहे. हे टिकवणे हे तरुणाईच्या हातात आहे. उद्घाटनानंतर भोणे येथील चिंतामण पाटील यांचे लोकसहभागातून जलसंधारण या विषयावर व्याख्यान झाले.  प्रास्ताविक प्रा.पंकजकुमार नन्नवरे यांनी केले तर सुत्रसंचालक प्रा.दिपक सोनवणे यांनी केले. प्रा.सत्यजित साळवे यांनी आभार मानले.

**बातमी क्र. २**

जळगाव दि. २१ (            ) केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने सुरु केलेल्या ` स्वयंम ` ऑनलाईन अभ्यासक्रमाची अधिक माहिती होण्याच्या दृष्टीने कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मंगळवार दि. २१ मे रोजी ज्ञानस्त्रोत केंद्र व अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने ` स्वयंम : मॉक्स् ॲण्ड `ई-कन्टेन्ट डेव्हलपमेंट` या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

प्र-कुलगुरू प्रा. पी.पी. माहुलीकर यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन झाले. यावेळी मंचावर अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे समन्वयक प्रा.एस.टी.इंगळे, ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.अनिल चिकाटे, स्वयंमचे समन्वयक डॉ.अजय सुरवाडे उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा.माहुलीकर यांनी शिक्षणातील नव्या बदलांना सामोरे जाण्याची तयारी ठेवायला हवी असे सांगून स्वयंम या योजनेद्वारे अनेक अभ्यासक्रम सुरु करण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत कुणीही या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ शकतो. कधीही कुठेही आणि केव्हाही शिकण्याची ही संधी आहे, त्याचा फायदा घ्यावा असे आवाहन प्रा.माहुलीकर यांनी केले. प्रास्ताविक डॉ.सुरवाडे यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.मनोज पाटील यांनी केले. डॉ.अनिल चिकाटे यांनी आभार मानले. उद्घाटनानंतर बांभोरी अभियांत्रिकी महाविद्यालयातील संगणक विभागप्रमुख प्रा. जे.बी. पटनाईक यांनी ई-कन्टेंट या विषयावर मार्गदर्शन केले. दुपारच्या सत्रात अधिष्ठाता प्राचार्य डी.आर.पाटील यांनी मॅसीव्ह ओपन ऑनलाईन कोर्स या विषयावर मार्गदर्शन करताना चॉईस बेसड् क्रेडिट सिस्टीममधील कौशल्यावर आधारित घटकांविषयी सविस्तर माहिती दिली. त्यानंतर श्री.निरज यांनी वेब सायन्स अवेअरनेस या विषयी मार्गदर्शन केले. प्रा.एस.टी.इंगळे यांच्या उपस्थितीत समारोप झाला. या कार्यशाळेत विद्यापीठ प्रशाळांमधील ७० प्राध्यापक सहभागी झाले होते.

---

जा.क्रः कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २१ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत प्रत/-

(डॉ.सुनील पाटील )

जनसंपर्क अधिकारी